श्रीपाद अपराजित
shripad.aparajit@timesgroup.com

राज ठाकरेंचे पात्र मुलाखतकारापुरते मर्यादित ठेवून अचानक उद्धव ठाकरेंना राज्यकर्ता बनविण्याची प्रसंगोचित धमक शरद पवारांनी दाखवली. दगाबाजीचा भूतकाळ विसरून या कामात पवारांना भक्कम पाठिंबा देणाऱ्या काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांची राजकीय खेळी दाद देण्याजोगी होती. दुसरीकडे विजयी वारू उधळण्याच्या प्रयत्नात साक्षात राज्यपालांनाच राजकीय रथाला जुंपण्याचे पाप भाजपने केले. देवेंद्र फडणवीस यांच्या परिश्रमी, प्रामाणिक आणि पारदर्शी प्रतिमेपुढे या रात्रकालीन राजकीय उद्योगाने काळे ढग उभे केले.

घरीं कामधेनू पुढें ताक मागे...

शरद पवार

देवेंद्र फडणवीस

ज्यातील महिनाभराचा गदारोळ शमलाय, असे सध्याचे स्वाभीशील चित्र आहे. महाराष्ट्रातील या राजकीय अध्यायाने अनेक बोध दिले आहेत - नेत्यांनाही, जनतेलाही! नैतिकतेचे इमले धाराशायी होताना सामान्य जनतेने पाहिले. दिवसाढवळ्या नेत्यांचे सामूहिक पक्षांतर जनतेला दिसले. राजकीय हव्यासातून झालेल्या रात्रीच्या अंधारनाट्याने तर वापूर्वीचे अनैतिकतेचे मापदंड मोडीत काढले. हा अभूतपूर्व पेच अनुभवताना सर्वांचीच मने संभ्रमित झाली. सकाळी झोपून उठताना नक्की कोणत्या राजकीय स्थितीला सामोरे जावे लागेल याविषयीचा अंदाज बांधणे कठीण झाले होते. एवढी अनिश्चितता राज्याने यापूर्वी अनुभवली नव्हती. या कालखंडाने स्वपक्षीयांतील विचारभेदांचा अंतरेकी साक्षात्कार बधितला. वैचारिक मतभिन्नतेला पूर्णांहूती देत कवटाळलेले नवमैत्री अनुभवले. कधी शिवाजी महाराजांच्या अस्मितेचा गजर झाला. शेतकऱ्यांच्या अगतिकतेची उच्चार बहुतेक सर्वांच्याच ओठी झळकला. सामान्य जनतेला या धडामोडींचा उबग आला होता. या पार्श्वभूमीवर श्रुब्ध जनतेला दिलासा वाटण्याचे काम नव्या सरकारला करायचे आहे.

मागची पाच वर्षे सत्तेत असणाऱ्या भाजप-शिवसेनेच्या सरकारमध्ये सारेकाही आलबेल होते, असे मुळीच नाही. शिवसेनेला फफ्फत नेष्याची एकही संधी भाजपने सोडली नाही. देवेंद्र फडणवीस माझे चांगले मित्र आहेत, असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे अगदी अलीकडेपर्यंत म्हणत राहिले. फडणवीस-ठाकरे यांच्यातील संघर्षी वृत्तीने तत्कालीन सत्तेतील तणाव दूर करण्यात मोलाची भूमिका निभावली. अर्थात, युतीच्या सरकारने विकासाचे नवे आदर्शही निर्माण केले. विशेषत: पायाभूत प्रकल्पांचे त्यांचे यश नजरेत भरणारे आहे. समृद्धी महामार्गाचा उपक्रमही राज्याला प्रगतीकडे नेणारा आहे. जलसिंचनाचे भक्कम काम केल्यानेतरही शेतकऱ्यांच्या मनातील राग काहण्यात मात्र युतीचे सरकार अपयशी ठरले. मत विभाजनाच्या व्यूहरचनेने भाजपच्या झोळीत १०५ जागा घातल्या हे खरे; मात्र त्यात काँग्रेसच्या अकर्मण्यतेचा वाटा दुर्लक्षण्याजोगा नाही. मतविभागणीतून सत्ता मिळविण्याची भाजपची खेळी यशस्वी ठरत होती. आता त्याला खीळ बसेल. राज्यातील नवसत्तेच्या समीकरणाचे दीर्घकालीन अस्तित्व भाजपची चिंता वाढविणारे आहे.

काँग्रेसचे निर्णयक्षमेचा, राष्ट्रवादीचा चिवटपणा, शिवसेनेचे व्यवहारचातुर्य आणि भाजपचा अतिआत्मविश्वास ही या वेळच्या विधानसभा निवडणुकीची प्रमुख वैशिष्ट्ये होती. भाजपला सर्वाधिक संख्याबळ बहाल करण्यामागचे सँचित साधले गेले ते वँचित आघाडीमुळे. कायम संशयाच्या भेऱ्यात सापडून्ही भाजपच्या विजयाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हातभार लावणाऱ्या वँचित आघाडीची वैचारिक लवचीकता डोळे विस्फारणारी होती. निवडणूक म्हटली की राजकीय गदारोळ येतोच. आधीच्या काळात विचारांची लढाई व्हायची. भाजपने यंदा निलाजरेपणाचा कळस गाठला. पाच वर्षांच्या सत्ताकाळानंतर जनतेने नव्या सत्तेच्या चाव्या सुपूर्द केल्या असतानाही भाजप-शिवसेनेने भांडण आश्चर्यात टाकणारे होते. तेवढी अनागोंदी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सत्ताकाळातसुद्धा नव्हती. या चार मुख्य पक्षांच्या बदललेल्या मानसिकतेने नव्याने गोंगाटे दडली आहेत.

प्रसंगोचित धमक

हिंदुत्वाच्या मुद्द्यावर आम्ही एकत्र आलो आहोत, असे उल्लेख भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांनी वेळोवेळी केले. राष्ट्रीय स्तरावर अडचणी वाढतील हे लक्षात आल्याने मागील काही वर्षांत भाजपने राम मंदिर प्रकरणापासून 'हवी तेव्हा जवळीक आणि उरवू तेव्हा अंतर' असा कायम पवित्रा ठेवला. सर्वोच्च न्यायालयाच्या एकमुखी निर्णयामुळे मंदिराचे कवित्व संपले, असे समजण्याचे कारण नाही. जुन्या दाव्यांच्या उजळणीकडे पाठ फरून भाजपतर्फे शिवसेनेला डिवचण्याची संधी सोडली जाईल असे नाही. महाविकास आघाडीत शिरकाव करण्यापूर्वी शिवसेनेने राम मंदिर आंदोलनापासून कधीही फारकत घेतली नव्हती. अयोध्येत राममंदिर हवेच ही भूमिका त्यांनी नेहमीच पुरेशा आक्रमकतेने मतदारांच्या मनांवर बिंबविण्याचा प्रयत्न केला. अयोध्येत जाऊन रामलल्लाचे दर्शन घेणारे शिवसेना पक्षप्रमुखच उद्धव ठाकरे हे राज्यातील एकमेव नेते ठरले. धर्मनिरपेक्ष भूमिका स्वीकारल्यानंतर त्यांच्या पूर्वीपेक्षाही अयोध्याघेटीची कोंडी होण्याची शक्यता आहे.

प्रचंड मतभेद असणाऱ्या पक्षांसोबत देशात सलगी करणाऱ्या भाजपने तीन दशकांपासूनच्या जुन्या मित्रपक्षाला एवढे का दुखावले, हा प्रश्न अनुत्तरित आहे. सत्तेतील शिवसेनेने भाजपपासोर कमालीचे नमते घेतल्याचे चित्र राज्याने बघितले. शिवसेनेच्या स्थानेपसूनची आक्रमकता पक्षप्रमुखांच्या सबुरीने गिळंकृत केली की काय, असा संशय व्यावा एवढ्या तडजोडी उद्धव ठाकरेंना कराव्या लागल्या. वस्तुतात राजपदेवे सक्षम नसले तरी उद्धव यांची संघटनक्षमता वादातीत आहे. जनभावनेचा कल लक्षात घेतला तर शहरीभा त्यांच्या प्रामाणिकतेचे गुणांकन अधिक ठरेल. अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदासाठी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहांसोबत झालेल्या बंदद्दार चर्चेची सत्यता सध्या तरी आरोप-प्रत्यारोपांच्या गर्तेत अडकली आहे. युती तुटल्याप्रमुळे फक्त महाराष्ट्र तेवढा काही काळ दूर जाईल, अशी कदाचित भाजपची समजूत असावी. ही भावना येत्या काळात चुकीची ठरण्याची शक्यता अधिक आहे. दुसरीकडे जुन्या चुकांच्या सव्याज परतफेडीचे धोरण शिवसेनेने अंगीकारले आहे. गोव्याचे राजकीय गणित विध्वंडविण्याची जाहीर धमकी शिवसेनेने देऊन टाकली आहे. संकटमोचक ठरण्याऐवजी संकटोभव ठरलेल्या भाजपश्रेष्ठींचा हटवादीपणा त्या पश्चात्या सर्व कार्यकर्त्यांही प्रथमच उमगला. त्यांची मने पक्षाला आणि आता अवघ्या राज्यालाच चिंताक्रांत केले. त्यांच्या आक्रमक छबीचे गुणगान करणाऱ्या समर्थकांवरही नंतरच्या आक्रस्ताळ्या वागण्यामुळे श्रब्धरण: भयचकित होण्याची वेळ आली. वारंवार उजागर होणाऱ्या अशा दोषांमुळे अंजत पवारांची प्रशासनातील कर्मठता झाकोळून गेली आहे. अशा अविश्वसनीय व्यक्तिमत्त्वावर प्रचंड विश्वास ठेवण्याचे घारिष्ठ्य भाजपने दाखविले. हीच चूक विरोधी पक्षांनी केली असती, तर सगळी 'परिवार-फौज' किती त्वेषाने आणि द्वेषाने तुटून पडली असती, याची दोन क्षण कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. देवेंद्र फडणवीस यांच्या परिश्रमी, प्रामाणिक आणि पारदर्शी प्रतिमेपुढे राजकारणीन उद्योगाने काळे ढग उभे केले. अनेकांना त्याचे दुःख आहे. त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनाही ते तेवढ्याच तीव्रतेने जाणवले यातून फडणवीस यांच्या सत्ताआरोहा विस्तारित पंधेप प्रकषनि कळते.

केंद्रीय नेतृत्वाने राबविलेल्या अंजत सलगीपासून राज्यातील जनतेला अज्ञात ठेवणे, ही निश्चितच राजकीय चातुर्याची बाब ठरते. भारतीय जनता पक्षाच्या केंद्रातील; तसेच राज्यातील ज्येष्ठ नेत्यांनाही या धडामोडींपासून अंलिप्त ठेवून पक्षातील नेतृत्व जोडीने काय साधले, हा प्रश्न सातत्याने उपस्थित होतो आहे. पुढेही होत राहील. राजकारणात प्रतिस्पर्ध्यांना धक्का द्यायचा असतो आणि साथीदारांना विश्वास! विजयी वारू उधळण्याच्या सारख्यासाठी साश्चात राज्यपालांनाच राजकीय रथाला जुंपण्याचे पाप भाजपने केले. महाविकास आघाडीचे राजकारण आकार घेत असताना देवेंद्र फडणवीस यांचा प्रवास अगतिकतेकडून असहायतेकडे झाला. एकनाथ खडसे हे आजकाल फार लक्ष देऊन ऐकावेत असे नेते राहिलेले नाहीत. त्यांची अलीकडची प्रतिक्रिया मात्र लक्षवेधी होती. तिकिटे नाकारल्यानंतरही खडसे, तावडे, बावनकुळेंना विश्वासात घेतले असते, तर पंचवीस जागा कमावता आल्या असत्या, या त्यांच्या दाव्यातही भाजपचेही अनेक कार्यकर्ते सहमत होते. केंद्रीय पने नितीन गडकरी यांची प्रचारकाळातील उपेक्षा आणि नव्या केंद्रीय सत्तेच्या काळातील अवहेलना सामान्य कार्यकर्त्यांनाही रुचलेली नाही. उधड बोलायचे नाही, या पक्षशिस्तीना बांधील असल्याने अनेक भाजप पदाधिकाऱ्यांनी सध्या मौन राखले असल्याचे कळते.

अतिसामान्यांनी पक्ष परंपरांचे ओझे पेलायचे आणि सर्वोच्च नेतृत्वाने मात्र तेवढ्याच निगरगुंडतेने या परंपरा झुगारून लावायच्या हा प्रत्यय त्या पक्षाने दिला. मोदी-शहांच्या धर्तीवरील एकाकल्पी वर्तणुकीचा दोष 'मी पुन्हा येईन' या फडणवीसांच्या घोषणेतून राज्यातील जनतेला जाणवला. 'मी नव्हे, आम्ही' या संघ परिवारातील प्रारंभिक शिकवणुकीचे त्यांना झालेले विस्मरण हा कदाचित सत्तेचा महिमा असावा. शेतकरीवर्गातील रोष अधिक पुष्ट करण्यासाठी विरोधकांनी या दर्पोक्तीचा पुरेपूर वापर करून घेतला. कार्यकर्त्यांभवे जोश निर्माण करण्यासाठी असे दावे करावे लागतात, हे राजकीय सत्य मान्य केले तरी अशा घोषणांपासून दूर राहिलेले बरे. ही 'जातीय वस्तुस्थितीची जाणीव' होण्यास फडणवीससारखा मेहनती नेता कमी पडला. 'ती' घोषणा नसती तर सध्या सोशल मीडियावरून होणारा फडणवीसांचा जाहीर उद्धार टळला असता असे नाही; मात्र विरोधकांना त्यामुळे आयते कोलीत मिळाले, याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. सत्तेच्या हव्यासाने सध्या राजकीय अस्पृश्यता पुसून काढण्याची स्पर्धा सुरू जाली आहे. आजवर विविध पक्षांच्या शिलेदारांनी संघर्ष नेटाने पेलला होता. त्या घोषणांना तिलांजली देत अंगीकारलेली राजरीस विटाळमुक्ती अराजकतेला जन्म देणारी ठरू शकते.

गुंगारा देईल शहाणपण?

विदेशी कर्जाची भीती रककम महाराष्ट्राच्या विकासात गुंतली आहे. अशा वेळी नव्या सरकारला जुन्या सरकारचे सर्व निर्णय सरसकट रद्द करून चालणार नाही. शेती बेभरवशाची झाली आहे. बळीराजाला आश्वसत करण्यासाठी लोकप्रिय नव्हे, तर शाश्वत उपाययोजनांची गरज आहे. भरताला अमेरिकेची बरोबरी गाठायला २० वर्षे लागतील असे बोलले जाते. अनेक बाबतीत ते खरेही आहे. बिहार, उत्तर प्रदेश, तसेच अन्य छोट्या राज्यांना महाराष्ट्राच्या बरोबरीने यायला २० वर्षे लागतील. गोवा, कर्नाटक, मॉण्पुरात सत्ता आणण्यासाठी भाजप नेत्यांनी केलेले व्यवहार महाराष्ट्रात राबविले सहज शक्य नव्हते. राजस्थान आणि मध्य प्रदेशात ते स्वस्थ बसलेले नाहीत. शिवसेनेची दोन्ही काँग्रेससोबतची वाटचाल सोपी नाही. 'घरीं कामधेनू पुढे ताक मागे'. हरिवोध सांईंन विवाद लागे। करीं सार चिंतामणी काचखंडे। तया मागतें देत आहे उदंडें' असा एक श्लोक आहे. समर्थांचा असल्याने संघ परिवारातील अनेकांना ती स्मरतही असेल. 'स्वतःच्या घरी गाय असताना शेजारी ताक मागत हिंडणाऱ्या गृहस्थ परमार्थ साधून वाद घालणाऱ्या माणसासारखा अनाकलनीय ठरतो. सर्व हरब्बा पूर्ण करणारा चिंतामणी गवसल्यानंतरही त्याच्याकडे काचेच्या तुकड्यांची अपेक्षा केली, तर काचखंडेच भरभरून मिळतील,' असा या श्लोकाचा भावार्थ आहे. भाजपच्या सद्यस्थितीला हा श्लोक 'शतप्रतिशत' लागू होतो. युती पक्षात असतेल्या शिवसेनेसोबतचा वाद त्यांनी नको तेवढा तापला. तीन दशकांची युती सोडून अंजतदादांची सोबत मागण्याचा आत्मघाती विचारांचे पाप भाजपने केले. महाविकास आघाडीचे राजकारण आकार घेत असताना देवेंद्र फडणवीस यांचा प्रवास अगतिकतेकडून असहायतेकडे झाला. एकनाथ खडसे हे आजकाल फार लक्ष देऊन ऐकावेत असे नेते राहिलेले नाहीत. त्यांची अलीकडची प्रतिक्रिया मात्र लक्षवेधी होती. तिकिटे नाकारल्यानंतरही खडसे, तावडे, बावनकुळेंना विश्वासात घेतले असते, तर पंचवीस जागा कमावता आल्या असत्या, या त्यांच्या दाव्यातही भाजपचेही अनेक कार्यकर्ते सहमत होते. केंद्रीय पने नितीन गडकरी यांची प्रचारकाळातील उपेक्षा आणि नव्या केंद्रीय सत्तेच्या काळातील अवहेलना सामान्य कार्यकर्त्यांनाही रुचलेली नाही. उधड बोलायचे नाही, या पक्षशिस्तीना बांधील असल्याने अनेक भाजप पदाधिकाऱ्यांनी सध्या मौन राखले असल्याचे कळते.

सुपर डील्स
ख्रिसमस व नवीन वर्षासाठी हॉलिडेज
ऑफर वैध 48 तासांपर्यंत
Thomas Cook Travel Smooth thomascook.in
A FAIRFAX Company
मर्यादित सिट्स उपलब्ध
कमीत कमी किंमतीत पीक सीजन हॉलिडेज
थायलंड - 6 दिवस ऑफर मूल्य: ₹32,428*
दुबई शॉपिंग फेस्टिव्हल - 6 दिवस ऑफर मूल्य: ₹47,065*
बाली - 7 दिवस ऑफर मूल्य: ₹56,250*
सिंगापूर - 5 दिवस ऑफर मूल्य: ₹56,497*
मॉरिशस- 7 दिवस ऑफर मूल्य: ₹72,686*
सिंगापूर आणि मलेशिया 6 दिवस ऑफर मूल्य: ₹83,581*
समाविष्ट: फ्लाइट्स, निवास, ट्रान्सफर्स, भोजन व स्थळदर्शन.
मदतीसाठी कॉल करा 88288 90310
ऑनलाईन बुक करा thomascook.in

तिहार तुरुंगात 'जल्लाद'च नाही

नवी दिल्ली : निर्भया बलात्कार प्रकरणातील दोषींच्या फाशीची शि अंमलबजावणी जवळ आली आहे. मात्र, तिहार तुरुंगात फाशी देण्यास जल्लादच उपलब्ध नसल्याने तिरुगातील अधिकारी चिंतेत आहेत. सूत्रांनी दिले माहितीनुसार, दोषींच्या फाशीची अंमलबजावणी एक महिन्याच्या काळात करण विचार तुरुंगातील अधिकारी करत आहेत.

राष्ट्रपतींनी दोषींच्या दयेचे अर्ज फेटाळल्यानंतर न्यायालय फाशीच्या शि अंमलबजावणी करण्यासाठी 'डेथ वॉरंट' जारी करते. हे वॉरंट जारी झाल्या कोणत्याही दिवशी दोषींना फाशी दिली जाऊ शकते. तिहार तुरुंगात या संसद हल्ल्यातील दोषी दहशतवादी अफजल गुरू याला फाशी देण्यात आ होती. तुरुंग प्रशासनाने एका राजीतून या प्रक्रियेची अंमलबजावणी केली ह या वेळी तुरुंग अधिकाऱ्यांच्या फाशी देण्यासाठीचा 'लिव्हर' ओढण्याची त दाखवली होती, असे सूत्रांनी सांगितले. आता अडचण टाळण्यासाठी तिहार तु प्रशासनाने इतर तुरुंगांकडे जल्लादासाठी विचारणा सुरू केली. या जल्लाद म्हणून काम केलेल्यांची माहिती उत्तर प्रदेशातील काही गावांम धेण्यात येत असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

Madhya Pradesh Govt. Emporium
Mrignayanee
Art from the heart
Chanderi & Maheshwari SUIT AND SAREE FESTIVAL
27 Nov. to 9 Dec.
11 am to 8:30 pm
Exclusive Designer Block Print & Traditional Handwoven Chanderi, Maheshwari, Kosa Silk Sarees, Handloom Bed Covers in Batik, Bagh, Chemical Print, Dress Materials, Dupatta etc.
VENUE: Congress Bhavan, Near PMC, Shivaji Nagar, Pune. Ph.: 9960909727
DISCOUNT up to 20%
Shop Online www.mphandicraft.com
Sponsored by: The Development Commissioner (Handloom), Ministry of Textiles, Govt. of India

ATTN. BRIGHT STD.10 STUDENTS (CBSE / ICSE / SSC)
PUNE'S BEST OVERALL RESULTS FOR 18 CONSECUTIVE YEARS
BEST SUCCESS RATE | BEST RETENTION RATE
OUR 2019 TOPPERS
JEE ADVANCED: Nishant Mittal AIR 275 KVPY SCHOLAR
JEE MAINS: Atharva Chandak 99.96 %ile
XII BOARDS: Akshat Zalte 96.5 % CBSE
950+ PUNE IIT RANKS
2500+ BITS / NIT / COEP SELECTIONS
45 FOREIGN UNIVERSITIES SELECTIONS
ADMISSIONS OPEN
2-YEARS GRANDMASTERS 2022 PROGRAM
XI + XII + JEE MAINS + JEE ADVANCED (for Std 10th)
1-YEAR PRODIGY 2020 PROGRAM
IIT FOUNDATION (for Std 7th, 8th, 9th)
Admission cum Scholarship Test 15th December 2019
Visit www.iitpk.com for 2019 Final Placements List
iiTP | IITian's Prashikshan Kendra | Committed to World-class Education | Helpline 7066256256
CENTERS : JM RD | KOTHRUD | MG RD | AUNDH | SATARA RD | NAGAR RD | SINHGAD RD | PCMC

TAPMI
ASSOCIATION AMBA ACCREDITED AACSB
Be groomed at India's leading B-school
Consistently ranked amongst top 20 B-schools TAPMI offers 50 scholarships worth INR 2.5 crores
Highest Package - PGDM (General) INR 20.0 lacs PGDM (BKFS) INR 15.0 lacs
Courses Offered - PGDM | PGDM (BKFS) PGDM (HR) | PGDM (Sales)
Admissions Open
Last date for Applications: 17th Jan, 2020
Where Learning is for Life
T. A. PAI MANAGEMENT INSTITUTE
Manipal - 576 104, Karnataka, India. Phone: 0820-2701000
www.tapmi.edu.in /mytapmi

बजाज फायनान्स लिमिटेड
CIN-L65910MH1987PLC042961
नोंदणीकृत कार्यालय: आकुर्डी, पुणे -४११०३५
कॉर्पोरेट कार्यालय: ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११००१४
मुदत ठेव योजना
क्रिसिल (CRISIL) कडून 'एफएए/स्टेबल' रेटिंग आणि इक्रा (ICRA) कडून 'एमएए (स्टेबल)' रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट करले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.
₹५ कोटी अगी देय पर्यंत वार्षिक व्याजदर (०७ क्रिसिल २०१९ पासून लागू) देय आहे.

कालावधी महिन्यांमध्ये	किमान ठेव (रु. मध्ये)	संचयी	विगर- संचयी			
			मासिक	त्रैमासिक	सहामाही	वार्षिक
१२ - २३	२५,०००	७.६०%	७.३५%	७.३६%	७.६०%	७.६०%
२४ - ३५		७.९०%	७.६३%	७.६८%	७.७५%	७.९०%
३६ - ६०		८.१०%	७.८१%	७.८७%	७.९४%	८.१०%

क) ठेवीचा विमल आकार हा सर ठेवीदारांसाठी राहील.
ख)(i) तांत्रिक त्रासीवर (पहाते, सर्व वर्ष ५ हजार लाख आणीबाणी नसती, लाभाच्या दुप्पलाच्या तरतुदी असतील, ४१ (पाच) कोटीपेक्षाच्या प्रत्येक ठेव रकमेवर वर दराच्या ०.२५% या दराने अतिरिक्त व्याज देते येईल.
(ii) वैद्यकदान विशिष्टतेच्या संबंधात आजार असलेले ज्येष्ठ (सहोदर) विधान हजारहून १ (पाच) कोटीपेक्षाच्या रकमेच्या ठेवीवर वार्षिक ०.५०% दराने अतिरिक्त व्याज देते येईल. हे व्याज केवळ त्या ठेवीवर देय होणाऱ्या एक वेळच्या व्याजावर असेल. ठेवीदार अतिरिक्त व्याज हवे असल्यास ते ०.५०% या अतिरिक्त व्याज विमाव्यतिरिक्त वार्षिक दुप्पट देय १५ कोटींपेक्षा XXXX रोपी ठेवीसाठी असेल ते ठेवी राहील.
(iii) बजाज अलियान्झ आहेत हुकूमच बजाज फिनसर्व्ह लिमिटेड (यापुढे 'बजाज फिनसर्व्ह' म्हणून उल्लेख करण्यात येईल) यांच्या